(5)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सावर्डे ता. हातकणंगले
जिल्हा कोल्हापूर या संस्थेस "कायम विना अनुदान
तत्वावर" खाजगी आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास
परवानगी व त्याबाबतच्या अटी व शर्ती.

---

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एडीआर-१९८९/२२७८/एमईडी-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १४; सप्टेंबर, १९८९.

<u>शासन निर्णय</u>:- महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षणांच्या सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात अशी सततची मागणी वाढत आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी या राज्यातील विद्यार्थी अहमहमिकेने पुढे येत आहेत. तसेच उच्च गुण प्राप्त विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश न मिळाल्यामुळे नैराश्याची भावना येण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनतेची मागणी व कांही अंशी गरज भागविण्यासाठी "कायम विना अनुदान तत्वावर" खाजगी आयुर्वेद महाविद्यालय सुरू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता,

२. हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या संस्थेने शासनाकडे कायम विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी मागितली होती व ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तथापि विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक/युनानी कॉलेज सुरु करण्यात येवून नंतर अनुदान मागण्यांत येते असाही शासनाचा अनुभव आहे. तथापी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाने <u>शासनाकडे अनुदान मागितले जाणार नाही</u> अशी हमी दिल्याकारणाने, व दिलेल्या हमीनुसार संस्था शासनाशी व्यवहार करेल अशी खात्री झाल्यामुळे, शासनाने हनुमान शिक्षण प्रसारक मंडळास सावर्डे ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथे कायम विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक कॉलेज सुरु करण्याची तात्पुरती [प्रोव्हीजनल] परवानगी शैक्षणिक वर्ष १९८९-९० पासून देण्याचा निर्णय घेतला आहे.

४. तरी या निर्णयाव्दारे शासन हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर या संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर, ~~सावर्डे~~ ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्याची खालील अटींच्या आधीन राहून परवानगी देत आहे.

..२.

True Copy
Principal
Ayurvedic Medical College
Peth Vadgaon, Tal-Hatkanangale, Dist- Kolhapur

५. सदर महाविद्यालयासाठी खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील :-

१] आयुर्वेदिक महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ६० इतकी राहील.

२] वार्षिक शैक्षणिक शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यामागे रुपये १५,०००/ - पेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.

३] मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत संस्थेच्या प्रवेशा-बद्दल कोणताही निर्बंध संस्थेवर असणार नाही.

४] प्रवेश क्षमतेपैकी १० टक्के जागा संस्थेने भराव्यात व उरलेल्या ९० टक्के जागा सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "अ" प्रमाणे भराव्यात.

५] एकूण प्रवेश संख्येपैकी १० टक्के जागा व्यवस्थापनाच्या इच्छेनुसार भराव्यात त्या जागांसाठी विद्यार्थ्यांने किमान ५० टक्के गुण मिळविलेले हवे. इंग्रजी विषयात व भौतिकशास्त्र [फिजिक्स]-रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयात मिळून ५०% पेक्षा कमी गुण असू नयेत. तसेच विद्यार्थी एकाच प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असावा. उर्वरित जागा सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे भराव्यात.

६] साधारणमणे आयुर्वेद महाविद्यालयांच्या प्रवेशासंबंधी शासनाने जे प्रवेश नियम आहेत, त्याच धर्तीवर खाजगी संस्थांना सुयोग्य ठरतील अशा तऱ्हेने विहित केले जावेत.

७] विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी संस्थेने एक निवड समिती नेमावी व त्यात शासनाचा प्रतिनिधी म्हणून सहाय्यक आयुर्वेद संचालक, पुणे हे राहतील.

८] आयुर्वेदिक महाविद्यालयांच्या शिक्षणाचा दर्जा हा भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली, केंद्र शासन व राज्य यांच्या मानदंडाप्रमाणे असणे अत्यंत आवश्यक आहे व हे दंडक सव्वा वर्षाच्या आत संस्थेने पूर्ण करणें आवश्यक आहे. म्हणून संबंधित संस्थेवर खालील गोष्टी बंधनकारक राहतील. [१५ महिन्यांचे आत]

अ] एका विद्यार्थ्याला २ खाटा या प्रमाणानुसार आयुर्वेदिक महाविद्यालयांना संलग्न असणारी जी रुग्णालये आहेत त्यात १२० खाटांची यथायोग्य व कायम स्वरूपात व्यवस्था केली पाहिजे. ही व्यवस्था बी.ए.एम.एस. च्या दुसऱ्या वर्षाचे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या आधी ४ महिन्यांच्या आत पूर्ण करुन शासनास त्याप्रमाणे कळवावे.

ब] शासनाची एक उच्चस्तरीय समिती या वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षणाचा दर्जा व प्रगती योग्य रीतीने होत आहे किंवा नाही या गोष्टींवर लक्ष ठेवून शासनास योग्य त्या शिफारशी करील.

.....३.....

True Copy

Principal
Ayurvedic Medical College
Peth Vadgaon, Tal-Hatkanangale Dist- Kolhapur

केटीएन/१३९८९

क] वैद्यकीय शिक्षणासंबंधी अस्तित्वात असलेले व पुढे अस्तित्वात येणारे जे काही नियम असतील ते पाळणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९] या महाविद्यालयाच्या प्रशासनावर व कार्यशीलतेसंबंधी शासनाचे नियंत्रण असण्यासाठी शासनाचा एक प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर राहील.

१०] आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी अनुदानाची मागणी या संस्था शासनाकडे करणार नाहीत असे लेखी अभिवचन त्यांनी शासनास दिले पाहिजे.

११] उपरोक्त अट क्रमांक ४ संबंधीचे स्पष्टीकरण सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये पहावे.

वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेने शासनाला लेखी लिहून देणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ र. म. गोसावी. ]
कार्यासन अधिकारी.

प्रति,
राज्यपालाचे सचिव.
मुख्यमंत्र्याचे सचिव.
मुख्य सचिव.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
प्रशासक [सा. प्र.] आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई ४०० ०१८.
सहाय्यक संचालक, आयुर्वेद पुणे, नागपूर, मुंबई.
सचिव, विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय [ओरिजनल साईड] [पत्राद्वारे]
प्रबंधक, उच्च न्यायालय [अॅपिलेट साईड][पत्राद्वारे]
महासंचालक, प्रसिध्दी व माहिती संचालनालय, मुंबई.
सर्व मंत्र्याचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
शिक्षण विभाग [ सा. शि १/व सा शि-३/विशी-२] मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे सर्व अधिष्ठाते.
हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सावर्डे, ता. हातकणंगले. जि. कोल्हापूर-४१६११४.
कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर [पत्राद्वारे]
निवडनस्ती.

True Copy
Principal
Ayurvedic Medical College
Peth Vadgaon, Tal-Hatkanangale Dist-Kolhapur

## परिशिष्ट "अ"

"विना अनुदान तत्वावरील "खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी प्रवेश आरक्षण नियम एकंदर १०० प्रवेश जागा हे प्रमाण धरून खालीलप्रमाणे करण्यात यावे:-

१] संस्थेच्या एकंदर ६० प्रवेश जागांपैकी ६ प्रवेश जागा आपल्या इच्छेनुसार संस्था भरील. उरलेल्या जागांपैकी,

अ] ४० प्रवेश जागा स्थानिक उमेदवारांसाठी गुणवत्तेनुसार भराव्या, स्थानिक मर्यादा संस्थेने ठरवाव्यात. परंतु ही स्थानिक मर्यादा ठरविण्यापूर्वी प्रत्येक संस्थेने स्थानिक मर्यादेच्या संबंधीचा ठराव पास करावा व शासनाची तशी परवानगी घ्यावी. प्रचलित नियमानुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची दक्षता घेतली जावी.

ब] १४ प्रवेश जागा संस्थेकडे संपूर्ण महाराष्ट्रातून प्राप्त झालेल्या अर्जामधून गुणवत्तेनुसार भराव्यात.

२] संस्थेने अर्जाचा नमुना वरील अट क्रमांक ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे तयार करावा.

३] अ] भारताचे नागरिकत्व धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. मात्र संस्थेच्या १० टक्के ६ जागांपैकी २ जागांपर्यन्त अनिवासी नागरिकांस ही अट लागू नाही.

ब] विद्यार्थ्याचे वय प्रवेश घेण्याच्या वेळी किंवा संबंधित शैक्षणिक वर्षातील दिनांक ३१ डिसेंबर रोजी १७ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

क] गुणवत्तेनुसार संस्था ज्यांना प्रवेश देईल त्या यादीतील एखादा विद्यार्थी विहित वयापेक्षा कमी वयाचा असावा, परंतु तो जर गुणवत्ता यादीमध्ये असेल तर अशा विद्यार्थ्याला १७ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर लगेचच्या पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्यात यावा असा प्रवेश द्यावयाच्या वेळी इतर विद्यार्थ्यांसाठी केलेल्या गुणवत्ता यादीत तो पात्र ठरतो किंवा नाही हे बघण्याची आवश्यकता राहणार नाही. जर संबंधित विद्यार्थ्याने लगेचच्या पुढील शैक्षणिक वर्षात हा फायदा घेतला नाही तर ती संधी मिळण्यास तो पुन: पात्र ठरणार नाही.

४] <u>शैक्षणिक अर्हता</u>:- [अ] वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्यास पात्र होण्यासाठी म्हणून विद्यार्थी बारावीची परीक्षा किंवा तत्सम परिक्षा भौतिक रसायन व जीवशास्त्र हे विषय घेऊन तसेच इंग्रजी हा विषय घेऊन उत्तीर्ण झाला पाहिजे. या परीक्षेत एकाचवेळी विज्ञान व रसायनशास्त्र व जीवशास्त्र व इंग्रजी

-२-

True Copy
Principal
Ayurvedic Medical College

विषयासहीत विद्यार्थ्यांना किमान ५० टक्के गुण मिळाले असले पाहिजेत. ही अट व्यवस्थापनाच्या मर्जीनुसार भरल्या जाणाऱ्या १०% टक्के जागांसाठी सुध्दा बंधनकारक आहेत.

ब] संस्थेच्या इच्छेनुसार १०टक्के विद्यार्थ्यांबाबत.

संबंधित विद्यार्थी भारतातील किंवा विदेशातील कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान भौतिक, रसायन व जीवशास्त्र या विषयासह उत्तीर्ण असावा. मात्र विदेशातील विद्यार्थ्यांची संख्या २ पेक्षा जास्त नसावी.

क] स्थानिक विद्यार्थ्यांबाबत.

संबंधित विद्यार्थी स्थानिक भागामधून कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परिक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र] हे विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

ड] इतर विद्यार्थ्यांबाबत.

संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परिक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र] हे विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

५] विद्यार्थ्यांनी खालील दर्शविलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील:-

१. भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र [हे प्रमाणपत्र विदेशातील विद्यार्थ्यास आवश्यक नाही].
२. जन्म तारखेचा दाखला.
३. बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.
४. शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र.
५. बारावीच्या परीक्षेचे गुणपत्रक.
६. विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यास शारिरिकदृष्टया पात्र आहेत किंवा नाही याचे रजिस्टर्ड वैद्यकीय प्रॅक्टीशनरचे प्रमाणपत्र.



True Copy

Principal
Ayurvedic Medical College.
Peth Vadgaon, Tal-Hatkanangale Dist- Kolhapur

६] गुणातून कांही गुण वजा करण्यासंबंधी व श्रेणीगुण देण्यासंबंधीची जी शासनाची तरतूद आहे ती संस्थेवर बंधनकारक राहील.

७] वागणूक व शिस्त

शासनाने केलेले विविध नियम व कायदे यानुसार एखादा विद्यार्थी जर राष्ट्र विघातक कार्य करतो किंवा त्यात गुंतला आहे असे जर आढळले तर संस्थेने त्या विद्यार्थ्याला काढून टाकले पाहिजे.

जर एखादा विद्यार्थ्याने खोटे प्रमाणपत्र किंवा खोटे प्रतिज्ञापत्र त्याच्या प्रवेशाच्या वेळेस दाखल केले असल्याचे आढळून आले तर त्याचा प्रवेश संस्थेने ताबडतोब रद्द करावा.

संस्थेस विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असता रॅगिंग करीत असल्याचे आढळून आले किंवा सिध्द झाले तर अशा विद्यार्थ्यांवर संस्थेने ताबडतोब कार्यवाही करुन प्रवेश रद्द करावा. प्रत्येक विद्यार्थ्याकडून संस्थेने चांगल्या वागणूकी बाबी व नियम मान्य असल्याचे एक हमीपत्र लिहून घ्यावे.

टिप :- संबंधित संस्थांनी याप्रमाणे अर्हता नियम छापावे.

८] उपरोक्त संस्था जोपर्यन्त भारतीय चिकित्सा परीषदे द्वारा मान्यताप्राप्त होऊ शकत नाही तोपर्यन्त तेथे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात बदलीने प्रवेश किंवा परस्पर बदलीने प्रवेश मिळणार नाही हे समजले असे संस्थेने विद्यार्थ्यांकडून लेखी घ्यावे.

९] उपरोक्त वैद्यकीय महाविद्यालयातून विद्यार्थ्याने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शासन अशा विद्यार्थ्यांना नोकरीची हमी देणार नाही हे विद्यार्थ्यांना कळवावे.

१०] उपरोक्त संस्थेने विद्यापीठाशी अभ्यासक्रमाबाबतचे संलग्नीकरण परस्पर करुन घ्यावे.

...........

गौ. मुंज/१३. ९. ८९.

True Copy

Principal,
Ayurvedic Medical College
Peth Vadgaon, Tal.Hatkanangale
Dist.Kolhapur

True Copy
Principal
Ayurvedic Medical College
Peth Vadgaon,Tal-Hatkanangale Dist- Kolhapur